# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक ०९/०२/२०२२ (बुधवार)**

**(सायंकाळ)**

---

## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण ची धडक कार्यवाही
## एकाच दिवसात अवैध दारू भट्टीचा नष्ट करून गुन्हयात पाहिजे असलेले आरोपी गजाआड केले

नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस निरीक्षक राहुल मागणीकर आणि स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीणचे पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे यांचे नेतृत्वातील पोलीस पथकाने धडक कार्यवाही करत गुन्हेगारांच्या मुसक्या आवळण्याची मोहिम राबवुन एकाच दिवसात अवैध दारूभट्टी गाळणारे आरोपी व गुन्हयामध्ये पाहिजे असलेले आरोपी यांना गजाआड केले.

दिनांक ०८.०२.२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण चे पथक उपविभाग रामटेक अंतर्गत अवैध धंदयावर आळा घालणेकामी पेट्रोलींग करीत असतांना गोपनिय बातमीदारा कडुन माहिती मिळाली की पोस्टे पारशिवनी हद्दीतील शिलादेवी शिवारातील इसम नामे अमर नैकाम हा आपले शेतात लोखंडी ड्रम लावुन मोहाफुल गावठी हातभट्टी लावुन अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळत आहे. अशा खबरेवरून मा. पोलीस निरीक्षक श्री. ओमप्रकाश कोकाटे, स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा. यांचे आदेशाने शिलादेवी शिवार येथे आरोपी चे शेतात रेड कार्यवाही केली असता आरोपी अमर अच्छेलाल नैकाम वय २९, वर्षे रा. शिलादेवी हा मोहाफुल गावठ हातभट्टी लावुन अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू गाळतांना मिळुन आल्याने याचे ताब्यातुन **२३०० मोहाफुल सडवा रसायण कि. २,३०,०००/— रू. ६० लि.मोहाफुल दारू १२,०००/— व मोहाफुल गावठी दारू गाळण्याचे साहित्यासह असा एकुण २,४५,९००/— रू चा माल जप्त करण्यात आला. आरोपी अमर अच्छेलाल नैकाम वय २९, वर्षे रा. शिलादेवी** चे विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे महा.दारूबंदी कायदयान्वये गुन्हा नोंद करून पुढील कार्यवाही करीता पोस्टे पारशिवनी यांचे ताब्यात देण्यात आले. ही कार्यवाही पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, पोलीस हवालदार गजेंद्र चौधरी, राजेंद्र रेवतकर, पोलीस नाईक रोहण डाखोडे, विपीन गायधने, अमोल वाघ यांचे पथकाने पार पाडली.

लॉजीस्टीक पार्क कंपणीने कुरीयरव्दारे आयफोन एक्स (प्धीवदम १०) किं. ०१,०५,०००/— रुपयाचा मोबाईल फोन एम्प्रेस मॉल येथे पाठविला होता. सदर मोबाईल फोन कुणीतरी अज्ञात चोराने चोरी केल्याची तक्रार दि. ०३/०९/२०१८ रोजी लॉजीस्टीक पार्क कंपणीकडून पो.स्टे. कळमेश्वर येथे दाखल करण्यात आली होती. सदर गुन्हयाचे तपासामध्ये करण दिपक परियाल रा. अकोट याने मुंबई येथे वास्तव्यास असलेल्या आपल्या मैत्रिणीला वरील मोबाईल फोन भेट दिला होता ही गोष्ट उघड झाल्याने कळमेश्वर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेकडून आरोपी करण दिपक परियाल, वय २७ वर्ष रा. राजदे प्लॉट, जिजामाता नगर, अकोट जि. अकोला याचा शोध घेण्यात येत होता, परंतु आरोपी पोलीसांच्या हाती लागला नाही. ०३ वर्षानंतर दिनांक ०८.०२.२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाच्या अथक प्रयत्नाने आरोपी हा अकोट येथे असल्याची खात्रीशिर माहिती मिळविली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या सहा.फौ. सुनिल मिश्रा, पोहवा निलेश बर्वे व दिनेश आधापुरे यांनी आरोपीस जिजामाता नगर अकोट जिल्हा अकोला येथुन ताब्यात घेवुन पोस्टे कळमेश्वर यांचे स्वाधीन केले.

तसेच पोस्टे खापा अप.क्र. ३८/२०२२ कलम ३७६ (२)(द) भादंवि या गुन्हयातील पिडीतेला आरोपीने लग्नाचे आमिश दाखवून तिचे सोबत वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापित केले. सदर पिडीतेला आरोपीचे नाव इम्रान असल्याचे माहित असुन त्याव्यतिरीक्त तिला अरोपीबाबत कुठलीही माहिती नव्हती. आरोपीविरूध्द नमुद गुन्हा दाखल झाल्याच्या दिवसापासुन स्थानिक गुन्हे शाखेकडून आरोपीचा शोध घेण्यात येत होता. याचदरम्यान पोलीसांना एक मोबाईल नंबर मिळून आला, सदर मोबाईल फोन बहुतेक आरोपी वापरीत असल्याचा अंदाज घेत पोलीसांनी मोबाईल फोनच्या सुगाव्यावरुन आरोपीचा मागोवा काढला असता दिनांक ०९.०२.२०२२ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास आरोपी नामे इम्रान शफीक अन्सारी वय २०, रा. प्लॉट नं. ६०५, पिली नदी, संघर्ष नगर सुरा मस्जिद जवळ नागपूर हा दहेगाव (रंगारी) येथे असल्याची खात्रीशिर माहिती प्राप्त झाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेच्या सहा.पोलीस निरीक्षक राजीव कर्मलवार, जितेंद्र वैरागडे, पोलीस हवालदार राजेंद्र रेवतकर, अमोल कुथे, पोलीस नायक आशिष मुंगळे, किशोर वानखेडे, उमेश फुलबेल, रोहण डाखोरे आणि अमोल वाघ यांनी आरोपीस दहेगाव (रंगारी) येथुन ताब्यात घेवुन पोस्टे खापा यांचे स्वाधीन केले.








पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर